Vol. 4 Special Issue -1 March 2018
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL


Special Issue on the Occasion of Maharashtra State Commission For Women and YCMOU Study Centre Sponsored National Seminar on

## Domestic Injustice and Women

March 8, 2018

Organized by

**Dept. of Home Science,**
**Shri Panditguru Pardikar Mahavidyalaya,**
**Sirsala, Dist. Beed (MS).**



*Guest Editor*
**Dr. R. T. Bedre**

*Associate Guest Editors*
**U. Y. Mane**
**A. B. Walke**

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

# CONTENTS

1. Women Empowerment In Indian Dance Vidya Lakshmi M.S & Prof. S N Susheela | 08

2. Magic Realism as Survival Strategy in Margaret Atwood's *Alias Grace* – A Female-Centric Reading / Dr. A. Vanitha | 16

3. Empowerment of Women in Performative Traditions And Their Role In Rituals through the Performing Arts / Dr.Sumana.R | 23

4. Domestic Injustice in Mahesh Elkunchwar's *Old Stone Mansion* / Dr M D Sasane | 30

5. Indian Scripture: Tool of Institutionalizing Oppression of Indian Women / Jadhav N. S. | 37

6. *My Feudal Lord*- an authentic instance of domestic violence: an autobiography by Tehmina Durrani / Dr. Shaikh Ajaz Perveen Mohd. Khaleeluddin | 44

7. Realities of Women's Status and Human Rights / Dr. Vandana Phatale | 49

8. Subversion Of Women In Margaret Atwood's *Siren Song* / Dr. K.Kokila | 51

9. New Forms of Women's Struggle / Dr. Ahilya B. Barure | 56

10. Women's Journey For Equality In Public Life / Dr. Bh. Padma Priya | 61

11. Women inHigher Education and Social Justice / Dr. Pavithra | 64

12. Causes of Maritally Separated Female Spouses And Its Impact on Their Life / Dr. Ayodhya Pawal | 68

13. Learning Soft Skills from Draupadi-- The Rovoting Woman of the Mahabharatha / Dr Maithry Shinde | 71

14. Female Exploitation in Mahesh Dattani's *Thirty Days in September*/ Sarang Gajanan Haribhau | 77

15. Indian Women and Domestic Violence /Dr.Varsha S. Zanvar | 82

16. Importance of Women Rights / Prof. Maleka Shaheen | 85

17. A Study of Women's rights / Dr. Choudhari Rekha Laxmanrao | 87

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

18. Vijay Tendulkar's 'Silence! The Court is in Session': A Woman Denied the Right to be a Woman / Mr. Tukaram B. Bobade | 91

19. भारतीय समाज और महिलाएँ / पी. सुनीता | 97

20. छहेज:स्त्री उत्पीडन प्रथा और प्रतिबन्धक कानून / प्रा विद्या बा. खाडे | 103

21. घरेलू हिंसा:महिलाओं का जीवनसंघर्ष एक विवेचन / प्रा.सुजाता सू. हजारे | 107

22. स्त्रियांचा वडिलोपार्जित संपंतीतील समान हक्क कायदा 2005 : एक अभ्यास / प्रा.उषा यशवंतराव माने | 114

23. स्त्रियांचा वडिलोपार्जित व पतीच्या संपत्तीतील हक्क. / डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे) | 122

24. स्त्रीयांचा वडिलोपार्जित व पतीच्या संपत्तीतील हक्क / प्रा. राणी जगन्नाथराव जाधव | 128

25. स्त्रियांच्या विकासातील उच्चषिक्षणाचे महत्व एक अभ्यास / डॉ.जयदिप रा. सोळंके | 139

26. स्त्रीया व मानवी हक्क / प्रा.डॉ. अहिरे भास्कर मुरलीधर | 146

27. स्त्रिया व मानवी हक्क / प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण | 151

28. स्त्रिया व मानवी हक्क / डॉ. बाबासाहेब गणपतराव देशमुख | 158

29. स्त्रिया व मानवी हक्क / प्रा. सलमा शेख, प्रा.निकाळजे जे. व्ही. | 164

30. महिला अत्याचार / प्रा.बिजायसिंग भावरदोडे | 166

31. महिलावरील कौटुंबीक अन्याय आणि मानवाधिकार : संवैधानिक तरतुदींचा अभ्यास / डॉ.प्रा.जी.व्ही. गट्टी | 175

32. मानवाधिकार व स्त्रीयांचे प्रष्न एक दृष्टीक्षेप / प्रा.डॉ.कदम एच.पी. | 179

33. महिला सबलीकरण विषयी कायदे व जाणीवा / डॉ.लोखंडे बी.बी. | 182

34. महिला अत्याचार विरोधी कायदेविषयक तरतूदींचा अभ्यास/ प्रा.शशिकांत परळकर | 191

35. महिलांच्या लैंगिक छळ विरोधी कायदा भूमिका व मार्गदर्शन / डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई | 196

36. महिला विषयक कायदे एक अभ्यास / प्रा.अरूणा वाळके | 203

37. महिला अत्याचार आणि कायदे / प्रा.डॉ.ज्ञानेश्वर सोनवणे | 209

38. भारतातील स्त्री शोषण आणि समस्यांचा अभ्यास / प्रा.डॉ.कुंभारीकर एन.एन. | 219

39. स्त्रियांवरील अत्याचार आणि कोटुंबिक हिंसाचाराची कारणे / प्रा.सय्यद अफरोज अहेमद | 223

40. स्त्री भ्रूणहत्या : भारतीय समाजापुढील एक आव्हाण / डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे | 229

41. आधुनिक स्त्रीवादी कवितेतून चित्रीत महिलावरील अन्यायाचे चित्रण–एक अभ्यास / प्रा. मायकर रामहरी बन्सी | 236

42. रामनाथ चव्हाण यांच्या साहित्यातील स्त्रियांचे चित्रण / प्रा.संभाजी दादाराव गायकवाड | 241

43. निवडक नाटकातील स्त्री पात्र, त्यांची व्यथा व मानसीकता : एक अभ्यास / गालफाडे एस. बी. | 246

44. महिला विषयीची सामाजीक मानसिकता / प्रा.संध्या ठाकरे | 252

45. कुटूंब स्तरावरील संस्कार व दुय्यम स्थान / प्रा.होके कैलास म. | 260

46. महिला अत्याचार प्रतिबंधक कार्यातील राष्ट्रीय महिला आयोगाची भूमिका : एक अभ्यास / प्रा.जी.एन.सोनवणे | 263

47. बालमजुरांचे मानवी हक्क आणि स्वयंसेवी संस्था / डॉ. भालेराव जे.के. | 268

48. स्त्रीयांच्या आहारातील कॅल्शीयम आणि लोहाचे महत्व / प्रा.सौ.बोरीवाले एम.पी. | 273

49. आरोग्य व उच्च शिक्षणाचे स्त्रियांच्या विकासातील महत्व / डॉ.जिजा राऊत | 277

Warpudkar (ACS) College Dist. Parbhani

23

# स्त्रियांचा वडिलोपार्जित व पतीच्या संपत्तीतील हक्क.

डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)
लोकप्रशासन विभाग प्रमुख
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,सोनपेठ जि.परभणी
mailto:somvanshimukta76@rediffmail.com

भारतीय समाजात वैदिक काळखंडात महिलांना सर्व क्षेत्रात समान संधी दिली जात होती असे इतिहास सांगतो. या देशात एकेकाळी मातृसत्ताक कुटूंब पध्दती अस्तित्वात होती. परंतु जसजशी मानवाने प्रगती साधली तसतसे स्त्रियांचे स्वातंत्र्य व मानवी हक्क मर्यादित होत गेले. स्त्रियांना काही धर्मग्रंथानी अपवित्र मानून त्यांच्यावर धर्मानुसार बंधने घातली. मनुसमृतीने स्त्री हे नरकाचे द्वार आहे, असे संबोधून, महिलांना धार्मिक बाबतीत काही बाबीपासून वंचित ठेवले. दुसऱ्या बाजूस देवी मानून पुजनीय बनविले परंतु एक व्यक्ती म्हणून स्त्रीला कोणतेही स्थान दिले नाही. स्त्री ही गुलाम, दासी व शुद्र असून ती सतत पुरूषांच्या अधिन असावी अशी व्यवस्था करण्यात आली. यामुळे स्त्रीयांना आपल्यामधील कलागुणांचा कधीही विचार करता आला नाही. तिच्या व्यक्तीमत्वाचा विकास करण्याची संधी मिळाली नाही. स्त्रीने पुरूषांच्या अंकीत राहून जीवन जगावे ही एक मर्यादा समाजाने स्त्रीवर लादली. काळाच्या ओघात स्त्रीयांनीही या नियमांचे काटेकोरपणे पालन केले. प्रत्येक आईकडुन आपल्या मुलीला हीच शिकवन दिली जाउ लागली की स्त्री ही गुलात आहे आणि तिने गुलाम बनूनच राहिले पाहिजे. यातच स्त्रीचे कल्याण आहे.

अशा परिस्थितीत स्त्रीयांना संपत्तीचा अधिकार मिळणार तो कसा ? वंशाचा दिवा हा मुलगा तो आपला वंश पुढे चालवतो म्हणून वडिलांच्या संपत्तीवर मुलांचाच हक्क होता. मुलगी ही परक्याचे धन – तिने आपल्या सासरी जसे असेल तसे राहिले पाहिजे. ही सर्व सामाजिक बंधने घालण्यातज आली. यामुळे महिलांना इतर हक्काप्रमाणेच वडिलोपार्जित हक्क व पतीच्या संपत्तीतील हक्कापासून वंचित ठेवण्यात आले.



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार तथा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी लढा दिला. भारतीय संसदेत, "हिंदुकोडबिल" सादर करून महिलांना संपत्ती विषयक हक्काबरोबरच मान – सन्मान मिळवून देण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. भारतीय राज्यघटनेमध्ये देण्यात आलेल्या महिला विषयक कलमांच्या आधारे महिलांना एक व्यक्ती म्हणून दर्जा मिळाला आणि त्याच बरोबर सर्वप्रकारचे मानवी हक्क प्राप्त झाले, त्यामुळे वर्तमान स्थितीत अमुलाग्र बदल झालेले आहे.

**संशोधन पध्दती :–** प्रस्तुत शोध निबंध लिहिण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहे.

प्राथमिक साधन सामग्रीमध्ये निरीक्षण, अनुभव याचा आधार घेण्यात आला आहे.

**दुय्यम स्त्रोत :–** यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिक, वृत्तपत्रे यांचा आधार घेण्यात आला आहे.

**उद्देश :–**

1. विडलोपार्जित संपत्तीच्या हक्काविषयी महिलांच्या मानसिकतेचा अभ्यास करणे.
2. महिलांच्या संपत्ती विषयक हक्का विषयी समाजाचा दृष्टीकोण अभ्यासणे.

**गृहितके :–**

1. आजही बहुतांश स्त्रीया वडिलोपार्जित संपत्ती मिळावी अशी आपेक्षा ठेवत नाहीत.
2. वडिलोपार्जित संपत्तीत मुलींचाही वाटा असावा अशी समाजाची मानसिकता नाही.

प्राचीन काळापासूनच स्त्रीयाना समाजात दुय्यम स्थान देवून त्यांना सर्व प्रकारच्या मानवी हक्कापासुन वंचित ठेववण्यात पुरुषसत्ताक व्यवस्था यशस्वी ठरली "कुटुंबापासूनच साधनसंपत्तीच्या मालकीहक्काबाबत स्त्री–पुरूषांत तफावत दिसून येते. परंपरेनुसार पुरुष कुटूंबाचा प्रमुख असल्याने तो कुटूंबाशी जास्त बांधील व जवळचा राहिला आहे. कुटूंबाच्या साधनसंपत्तीत स्त्रिला समान वाटा मिळत नाही. नवऱ्यानंतर स्त्रिला हक्क सांगता

Warpudkar (ACS) College Dist. Parbhani

येत नाही''[1] ही वास्तूस्थिती आजही आपणस पहावयास मिळते. स्त्रीच्या कुटूंबात मुल होण्या अगोदरच पतीचे निधन झाले तर त्या स्त्रिला कुटूंबाकडून मिळणारी वागणुक अतिशय अपमानास्पद असते. माहेरची परिस्थिती व मानस चांगली असतील तर तिला आधार मिळतो अन्यथा अशा अनेक स्त्रियांना अन्याय सहन करीत जीवन जगावे लागते.

स्वतंत्र भारतामध्ये महिलांच्या हक्काविषयी व्यापक भूमिका घेण्यात आली. भारतीय राज्यघटनेत महिलांच्या हक्कासंबंधीचे स्पष्ट विवेचन करण्यात आले. तसेच विविध कायदे करून महिलांचे हक्क सुरक्षित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने हिंदु कोड बिलाचा उल्लेख करावा लागतो. ''भारताचे पहिले कायदामंत्री डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदु कोड बिल तयार केले. जे हिंदु स्त्रियांना व्यापक हक्कांची प्राप्ती करून देणारे होते. यामुळे संपत्ती संबंधीचे कायदेशीर अधिकार प्राप्त होणार होते. या हिंदु कोड बिलामध्ये खालील अधिकाराचा समावेश होता.''

1. घटस्फोटाचा अधिकार व पोटगीचा अधिकार.
2. स्त्रियांना दत्तक घेण्याचा अधिकार
3. स्त्रियांना स्वतःच्या मिळकतीवर अधिकार
4. वडिलांच्या मिळकतीवर मुला इतकाच मुलींना अधिकार.
5. मुलीला वारस होण्याचा अधिकार
6. स्वतःचा वारस निश्चित करण्याचा अधिकार [2]

परंतु संसदेत हिंदु लोक कोड बिल संमत होउ शकले नाही. '' डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी कायदामंत्री पदाचा राजीनामा देवून महिलांच्या हक्कांना एक प्रकारे पाठिंबाच दिला ''[3] यावरून तत्कालीन संसदेतील पुरूष सभासदांची पुरूषी मानसिकता प्रकट होते. 1956 मध्ये हिंदु वारसा हक्क कायदा करून कलम 6 नूसार मुलींना एकत्र कुटूंबाच्या मिळकतीमध्ये काही हक्क प्राप्त झाले. परंतु या कायद्यानुसार विवाहित मुलींला संपत्तीत वाटा मिळत नसे. यासाठी 2005 मध्ये हिंदू वारसा हक्क सुधारित कायदा 2005 हा कायदा करून वारसा हक्कांमध्ये कायदेशिर आवश्यक ते बदल करण्यात आले. या कायद्यानूसार हिंदू कुटूंबात जन्माला आलेल्या प्रत्येक मुलीला (विवाहित / अविवाहित ) कुटूंबाच्या मालमत्तेत



Warpudkar (ACS) College Dist. Parbhani

समान अधिकार मिळाला आहे. अर्थात वडिलांच्या संपत्तीत मुलींना समान वाटा मिळविता येतो.

पतीच्या अकाली मृत्युनंतर पतीच्या वाट्याला आलेल्या पैशावर, मालमत्तेवरील वारसाहक्कावर त्यांच्या मृत्युनंतर त्याच्या विधवेला सहजासहजी हक्क मिळत नाही. परंतु जो पर्यंत ती स्त्री दुसरा विवाह करत नाही तो पर्यंत तिचा पतीच्या मालमत्तेवर हक्क राहतो. कायद्याने हा तिचा वारसाहक्क मानलेला आहे पण तो हक्क मिळविण्यासाठी अनेकवेळा कायदेशीर लढा द्यावा लागतो. संयुक्त कुटूंब पध्दतीमध्ये हा प्रश्न निर्माण होतो.

या शोधनिबंधात वडिलोपार्जित संपत्तीतील स्त्रियांचा हक्क या अनुषंगाने अभ्यास करीत असतांना भारतीय समाजातील महिलांची आपल्या वडिलोपार्जित संपत्तीच्या हक्काविषयी मते जानून घेण्यात आली. 40 विवाहित स्त्रियांची मुलाखत घेउन त्यांना आपल्या वडिलांच्या संपत्तीतील वाटा हवा किं नको हे विचारण्यात आले असता बहुतांश स्त्रियांनी वडिलोपार्जित संपत्ती मिळविण्यासाठी नकार दर्शविला. स्त्रियांच्या मनावर प्राचीन काळापासून जे विचार बिंबवण्यात आले आहेत त्याचा तो प्रभाव आहे असे वाटते. आजही समाजातील बहूतांश महिला वडिलांच्या संपत्तीमध्ये वाटा मागण्यासाठी तयारी दाखवत नाहीत. शतकानुशतके चालत आलेल्या रूढी प्रथा परंपराचा प्रभाव आजही समाजावर आहे. ज्याप्रमाणे मुलींची मानसिकता आपला हिस्सा मागण्याची नाही त्याचप्रमाणे आई वडिलही आपल्या संपत्तीतील वाटा मुलींना देण्यासाठी मानसिकदृष्ट्या तयार होताना दिसत नाही. आजही मुलगी हे परक्याचे धन आणि मुलगा हा वंशाचा दिवा ही मानसिकता बदलली दिसून येत नाही.

अनेक स्त्रियांची आर्थिक परिस्थिती नाजूक असूनही माहेरच्या वडिलोपार्जित संपत्तीतील वाटा मागत नाहीत. कारण भिती असते ती माहेर तुटण्याची माहेरच्या कुटूंबातील सदस्यांचा रोष वाढवून घेउ नये. त्यांच्याषी असलेले नाते तुटु नयेत या कारणांने अनेक स्त्रिया कायद्याने त्यांना प्रदान करण्यात आलेले हक्क मागत नाहीत.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

कायद्याने स्त्रियांना वारसाहक्क मिळाला आहे. याचा फायदा घेऊन काही स्त्रियांना सासरच्या लोकांचा त्रास सहन करावा लागतो आहे. मालमत्तेच्या लोभापायी सासरच्या मंडळीकडून, पतीकडून अनेक विवाहित स्त्रियांचा परित्याग केला जात असल्याची उदाहरणे आहेत. यातून स्त्रियांची स्थिती ही दोन्ही घरची पाहूणी उपाशी अशी होताना दिसून येत आहे''4

स्त्रियांच्या वारसा हक्कांचा विचार करता आजही भारतीय समाजाचा दृष्टीकोण बदलला आहे असे चित्र दिसून येत नाही. तसेच स्त्रियामध्ये आपला वारसा हक्क मिळविण्याची इच्छा आहे असेही चित्र दिसून येत नाही. ज्याप्रमाणे भावा – भावामध्ये वडिलांच्या संपत्तीची वाटणी होते. त्याप्रमाणे मुलींचा विचार केला जात नाही. कायद्याने बंधन आहे म्हणून वडिलोपार्जित संपत्ती मुलांच्या नावे करीत असतांना अनेक कुटूंबात मुलींकडून कायदेशीर रित्या हक्क सोडण्यासाठी हक्क सोड पत्र तयार करून घेतले जाते तर काही वेळा संबंधित व्यक्तीकडून प्रतिज्ञापत्र किंवा ना हकरत पत्र करून घेतले जाते. यावेळी कांही स्त्रीया आपली गरज इच्छाही व्यक्त करू शकत नाहीत कारण त्यांना भिती असते माहेर, भाउ आपल्यापासून दूरावेल याची

एखाद्या मुलींने कायद्यानुसार आपल्या संपत्तीतील वाटा मिळावा यासाठी इच्छा प्रगट केली असता समाजात त्याविषयी चांगल्या प्रतिकिया मिळत नाहीत. त्या मुलींला समाजातील लोक दोष देतात भाउ – बहिण नात्यामध्ये वितुष्ट येते. कायद्याने जरी स्त्रियांना वडिलोपार्जित हक्क दिला असला तरी समाजाने त्याचा स्वीकार केला नाही.

**गृहितकृत्याची पडताळणी** :– प्रस्तुत शोधनिबंधासाठी निश्चित करण्यात आलेले गृहितकृत्य कमांक एक – आजही बहुतांष स्त्रिया वडिलोपार्जित संपत्ती मिळावी अशी आपेक्षा ठेवत नाही हे गृहितकृत्य सत्य सिध्द होते. 40 पैकी 38 महिलांनी वडिलोपार्जित संपत्तीचा वाटा घेणार नाही असे स्पष्ट सांगीतले. तर 2 महिलांनी गरत पडली तर घेउ अशी प्रतिकिया दिली.

तसेच दुसरे गृहितकृत्य वडिलोपार्जित संपत्तीत मुलींचा वाटा असावा अशी समाजाची मानसिकता नाही. काही महिला सासरच्या



Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

लोकांमुळे संपत्तीमध्ये वाटा मागतात तेंव्हा त्यांना तो सहज मिळत नाही तसेच आई – वडिल व भाउ यांचाही ही मानिसक इच्छा दिसून येत नाही. या शोधनिबंधाचे दोन्ही गृहितकृत्य सत्य सिध्द होतात.

**निष्कर्ष** :– डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रिला एक व्यक्तींचा दर्जा मिळवून देण्यासाठी भारतीय राज्यघटनेमध्ये सर्व मुलभुत अधिकार पुरुषांबरोबर कोणताही भेदभाव न करता मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याच बरोबर हिंदु कोड बिलाच्या माध्यमातून आर्थिक अधिकार मिळावेत यासाठी 'हिंदु कोड बिल' संसदेत सादर केले. त्याला संसदेची मंजूरी मिळाली नाही म्हणुन त्यांनी आपल्या कायदामंत्री पदाचा त्यागही केला. पण त्याकाळी असलेल्या अल्पशा महिला प्रतिनिधीं त्यांच्या बाजूने विचार मांडण्यासाठी पुढे येउन आपल्या स्त्रियांच्या हक्कासाठी बोलल्या नाहीत.

याच प्रमाणे आजही स्त्रियांच्या संपत्ती विषयक हक्काविषयी स्त्रि–पुरूषांची अर्थात एकूण समाजाची मानसिकता बदलेली नाही. किंबहूना अनेक स्त्रियांना आपल्या हक्काविषयी परिपूर्ण अशी माहिती नाही आज अनेक मुली आई–वडिलांची काळजी घेतात, तरी त्यांना हा हक्क नाकारला जातो. यासाठी गरज आहे. स्त्रिला कायदेशीर साक्षर करण्याची तिच्या हक्कांची तिला माहिती करून देण्याची, स्त्रिला आर्थिकदृष्ट्या सक्षमक करण्याची याचबरोबर नात्या–नात्यात तेढ निर्माण करण्याऱ्या समाजात प्रबोधन घडवून आणण्याची.

**संदर्भ सूची** :–


1. डॉ.पंजाब चव्हाण –महिला सक्षमीकरण, लोकविद्या प्रकाशन, परभणी 2008 पृ.क. 74
2. डॉ.सोलापुरे राजेश –मानवी हक्क आणि समाज अरूणा प्रकाशन, लातूर 2014 पृ.क.90
3. उपरोक्त पृ.क. 90
4. ॲड.नीलिमा कानेटकर – तिचा वारसा हक्क लोकसत्ता चतुरंग 20/09/2014


□□□

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College Sonpeth Dist. Parbhani